Batch 2023-24

# TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, PUNE
## BACHELOR OF COMPUTER APPLICATIONS (B.C.A.)
## BCA SPECIALIZATION IN CYBER SECURITY (CS)/
## BACHELOR OF SCIENCE (CYBER SECURITY)/
## BACHELOR OF SCIENCE
## EXAMINATION : DECEMBER - 2025
## SEMESTER – III
### Sub: Marathi (BCA23 –305/BCAC23-305/BSC24-305/BSCC24-305)

**दिनांक: २७/१२/२०२५** **गुण : ३०** **वेळ : दु. २.०० ते दु. ३.३०**

**सूचना :**
१) सर्व प्रश्न सोडवा.
२) उजवीकडील अंक त्या प्रश्नांचे गुण दर्शवितात.
३) उत्तरपत्रिकेत प्रश्नपत्रिकेतील प्रश्नक्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

**प्रश्न १ खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे द्या.** **(०५)**

१. एखाद्या विषयास निश्चित अर्थामध्ये बांधणे त्याला -------- म्हणतात.
अ) सारांशलेखन ब) पत्रलेखन
क) निबंधलेखन ड) अर्जलेखन

२. अर्धवट, तोडलेले बोलणे दाखवण्यासाठी ------- चिन्ह वापरले जाते.
अ) लोप चिन्ह ब) विसर्ग
क) अर्धविराम ड) उद्गार चिन्ह

३. प्रशासनिक लेखनात -------- अनावश्यक ठरते.
अ) नेमकेपणा ब) भावनिकता
क) अल्पक्षरत्व ड) मुद्देसूदपणा

४. --------- ह्यांना सजातीय स्वर म्हणतात.
अ) अ, आ ब) आ, इ
क) ई, अ ड) ई, ऊ

५. ------ ह्यांना अल्पप्राण वर्ण म्हणतात.
अ) श, स ब) ख, छ
क) फ, ष ड) क, ट

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(१५)**

१. निबंध लेखन करण्यासाठी कोणती पूर्वतयारी करावी?

२. सारलेखनाची तंत्रे सांगा.

३. शुद्धलेखनासाठी अनुस्वाराचे नियम सांगा.

४. व्याकरणाचा अभ्यास का महत्त्वाचा ठरतो?

५. औपचारिक व अनौपचारिक पत्रलेखनातील फरक स्पष्ट करा.

**प्रश्न ३ कोणताही एक प्रश्न सोडवा** **(१०)**

१. ५०० शब्दात निबंध लिहा.

**वेळेचे महत्त्व**

**किंवा**

२. **दिलेल्या उताऱ्याचे १/३ सारांशलेखन करा, उताऱ्यास योग्य शिर्षक द्या.**

मराठीच्या वाङ्मयेतिहासात काव्याचा वाटा फार मोठा आहे. तेराव्या शतकापासून तो आजपर्यंतच्या समग्र प्रवाहाकडे पाहिल्यास एक गोष्ट ठळकपणाने ध्यानात येते की, आपल्या कवितेची प्रश्न निर्माण करण्याची क्षमता थक्क करणारी आहे. कवितेने प्रत्यक्ष निर्मात्या कलावंतांपुढे, भाविकांपुढे, शब्दालंकारप्रेमी रसिक वाचकांपुढे, जिज्ञासू अभ्यासकांपुढे आणि समीक्षकांच्याही अनेक पिढ्यांपुढे अनेकांगी प्रश्न, सतत उपस्थित केले आहेत. या साऱ्यांच्याच आकलनाला आव्हान दिले आहे. या प्रक्रियेत कवितेलाही अनेक चढउतारांच्या दिव्यातून जावे लागले. त्याळेच साचलेपणाचा तवंग खरवडून काढून आणि नव्या उमाळ्यांना गतिशील करणे ही कामे, इतर वाङ्मय प्रकारांपेक्षा काव्यानेच सातत्याने व जोमाने पार पाडली आहेत. काव्यप्रकार म्हणूनच सनातन असूनही नित्यनूतन उरला आहे.

नवेपणाची व वेगळेपणाची जाणीव ही अस्तित्व समृद्ध कणारी असते. वैशिष्ट्यपूर्णतेच्या या परितुष्टीतूनच अधिक नवे आकारास येते. आकार धारण करीत असतानाच सभोवतालच्या दृष्यादृश्य घटनाचे रंगबेरंग त्यात मिसळत असतात. मग या घटना व्यापक स्वरुपातील राजकीय, सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिक पद्धतीच्या असोत; अथवा देश-प्रांत मर्यादित रुपातील असोत त्यांचे या नवेपणाशी नाते असतेच.

**किंवा**

३. **खालील उतारा शुद्धलेखनासह, योग्य विरामचिन्हे वापरून पुन्हा लिहा.**

झाड म्हणजे काय असा प्रश्न कूणाला विचारला तर तो काय उत्तर देइल काहीजण म्हणतील झाड म्हणजे गवत नव्हे तर आणखी काहिजण म्हणतील झाड म्हणजे वेल नव्हे खरच झाड म्हणताच आपल्या मनात काय उभं राहतं ज्याची मुळ खोलवर जमिनीत गेली आहेत ज्याला एक छोटामोठा बुधा आहे अनेक शाखा म्हणजे फांद्या आहेत आणि त्या शाखा हिरव्यागार पानांणी आणि रंगिबेरंगी फुलांणी किंवा फळांणी बहरलेल्या आहेत असंच दृश्य मनासमोर येईल ना

झाड झुडुप झाडोरा वृक्ष महावृक्ष अशी झाडसृष्टीची विवीध नावं आपण ऐकतो झाडाच्या आसपास वाढलेली झुडुपं तुम्ही पाहिलेली असतील त्यांचं रूप झाडचंच असत पण अपेक्षित उंची डौलदारपणा या गोष्टी तिथं नसतात झाडोरा हा शब्द सहसा कधी येत नाही तो झाडझाडोरा असाच येतो झाडझाडोरा म्हणजे एखाद्या छोट्या-मोठ्या भुप्रदेशावरची सर्व प्रकारची झाडं अन त्या भोवतीची झुडुपं व अन्य वनस्पतीसंग्रह. गंमत म्हणजे झाडा चा वृक्ष झाला की लगेच नंपुसकलिंगी असलेलं झाड पुल्लीगी होतं भरपूर उंची आहे बुंधा चांगला जाडजूड आहे आणि असंख्य फांद्या पानांनी डवरलेलं आहे असं झाड दिसलं कि आपण त्याला वृक्षम्हणतो आणि याहीपेक्षा आकारमानाने उंचीने मोठं दाटीवाटीने बहरलेलं आणी कित्येक वर्षाचं आयुष्य असलेलं असं जे झाड असतं त्याला महावृक्ष म्हणतात